# प्रेसनोट

दि.२१/०३/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.३५६/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | रमेशकुमार जगन्नाथ धडील, वय-५७ वर्ष, धंदा-नोकरी, सहायक आयुक्त, वर्ग-१, मत्स्य व्यवसाय (तांत्रिक), अहिल्यानगर, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लाचेचा पहिला हप्ता म्हणुन २०,०००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांची पत्नी व बहिण यांच्या नावे प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत भुजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन हा प्रकल्प मंजुर झाला आहे. शासनाच्या अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाचे कामकाज पूर्ण झालेले आहे. तक्रारदार यांची पत्नी यांच्या नावे असलेल्या प्रकल्पास शासनाकडून आज पावेतो ३,८८,८००/- रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच तक्रारदार यांची बहिण यांचे नावे असलेल्या प्रकल्पास शासनाकडून २९,१६,०००/- रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान शासनाकडून येणे बाकी आहे. दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान मिळण्याकरीता प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी आरोपी लोकसेवक रमेशकुमार जगन्नाथ धडील, सहायक आयुक्त, वर्ग-१, मत्स्य व्यवसाय (तांत्रिक), अहिल्यानगर यांनी ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार दि.२०/०३/२०२५ रोजी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.२०/०३/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई करण्यात आली. लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक रमेशकुमार जगन्नाथ धडील यांनी तक्रारदार यांच्या दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान मिळण्याकरीता प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे पंचा समक्ष ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. दि.२०/०३/२०२५ रोजी वरवंडी, ता.राहुरी येथील श्री.गोरक्षनाथ आडसुरे यांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक रमेशकुमार धडील यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून २०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक धडील यांचेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशन गुरनं.३५६/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.२१/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :- ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर